सबसे ‘तेज’ ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : १९१ | शुक्रवार, दि. ३ एप्रिल २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

## श्री हनुमानजींच्या जन्मोत्सवानिमित्त श्री मंगळग्रह मंदिरात रुद्राभिषेक महापूजा

### ‘श्रीराम जय राम जय जय राम’, ‘संकटमोचन हनुमानजी की जय’चा जयघोष; दिवसभर भाविकांची मांदियाळी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील श्री मंगळग्रह मंदिरात श्री हनुमानजींच्या जन्मोत्सवानिमित्त मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवार, दि. २ एप्रिल रोजी पहाटे ५ ते सकाळी ८ यावेळेत मंदिराचे मंगल सेवेकरी पुषंद ढाके यांच्या हस्ते श्री मंगळग्रह देवतेवर विशेष पंचामृत अभिषेक करण्यात आला. त्यानंतर श्री मंगळेश्वर पंचमुखी हनुमानजींच्या मूर्तीवर अमळनेरमधील सुपरिचित भगवती टी स्टॉलचे संचालक बाळासाहेब अशोक पाटील व नगरसेविका सौ. छायाताई बाळू पाटील या दाम्पत्याच्या शुभ हस्ते विशेष रुद्राभिषेक महापूजा करण्यात आली.

प्रारंभी या दाम्पत्याने गणपती बाप्पांचे पूजन केले. त्यानंतर श्री मंगळेश्वर पंचमुखी हनुमानजींच्या मूर्तीवर विधिवत रुद्राभिषेक करण्यात येऊन हनुमान जन्मोत्सव सोहळा झाला. यावेळी रामरक्षा स्तोत्र, हनुमान चालीसा पठण तसेच भाविकांकडून पुष्पवृष्टी होऊन पाळणा हलवत भक्तिमय व मंगलमय वातावरणात ‘श्रीराम जय राम जय जय राम’ ‘संकटमोचन हनुमानजी की जय’, असा जयघोष करण्यात आला. त्यानंतर धूप, दीपसह नैवेद्य दाखवून महाआरती झाली. श्री मंगळग्रह मंदिराचे पुरोहित प्रसाद भंडारी यांनी पौरोहित्य केले. त्यांना जयेंद्र वैद्य, अतुल दीक्षित, मंदार कुलकर्णी, वैभव लोकाक्षी, गणेश जोशी, पवन शर्मा यांनी सहकार्य केले. त्यांना उमेश पाठक यांनी सहकार्य केले. मंगळग्रह सेवा संस्थेचे सचिव एस. बी. बाविस्कर, खजिनदार गिरीश कुलकर्णी, मंगल सेवेकरी पुषंद ढाके यांच्यासह मंदिराचे सेवेकरी व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, श्री हनुमानजींच्या जन्मोत्सवानिमित्त सायंकाळी श्री मंगळग्रह मंदिरात संगीतमय सुंदरकांडचेही आयोजन करण्यात आले.





*अमळनेर : येथील श्री मंगळग्रह मंदिरात गुरुवार, दि. २ एप्रिल रोजी श्री मंगळग्रह देवतेवर विशेष पंचामृत अभिषेक करताना मंदिराचे मंगल सेवेकरी पुषंद ढाके. त्यानंतर श्री मंगळेश्वर हनुमानजींच्या जन्मोत्सवानिमित्त विशेष रुद्राभिषेक महापूजा करून पाळणा हलविताना अमळनेरमधील सुपरिचित भगवती टी स्टॉलचे संचालक बाळासाहेब अशोक पाटील व नगरसेविका सौ. छायाताई बाळू पाटील.* (छायाचित्रे : मयूर चौधरी)

## विषबाधेने ८५ मेंढ्या दगावल्या

### आंबापिंप्रीत ठेलारी कुटुंबावर संकट; १९२ मेंढ्यांवर वेळीच औषधोपचार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : आंबापिंप्री (ता. पारोळा) येथे शेतातील पिके खाल्ल्यानंतर विषबाधा होऊन तब्बल ८५ मेंढ्या दगावल्या आहेत. ही घटना बुधवार, दि. १ एप्रिलच्या रात्रीपासून गुरुवार, दि. २ एप्रिल रोजी दुपार या दरम्यान घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून, ठेलारी कुटुंबासमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे.

या घटनेबाबत मिळालेल्या माहितीनुसार ठेलारी कुटुंबीय ८०० मेंढ्यांचा कळप परिसरातील शेत शिवारात चरायला घेऊन गेले होते. यावेळी मेंढ्यांनी गहू व टोमॅटोचे पीक खाल्ले. त्यामुळे काही वेळातच मेंढ्या जमिनीवर लोळायला लागल्या, काही जोरदार धक्क्याने कोसळल्या, तर काहींनी तडफडत प्राण सोडले. संबंधित गहू व टोमॅटो या पिकांवर फवारण्यात आलेल्या कीटकनाशकामुळे मेंढ्यांना विषबाधा झाली असण्याची शक्यता व्यक्त होत आहे. मात्र, अधिकृत कारण अजूनही स्पष्ट होऊ शकलेले नाही.



*अमळनेर : आंबापिंप्री (ता. पारोळा) येथे शेतातील पिके खाल्ल्याने विषबाधा होऊन बुधवार, दि. १ एप्रिलच्या रात्रीपासून गुरुवार, दि. २ एप्रिल रोजी दुपार या दरम्यान ८५ मेंढ्या दगावल्या. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी पोहोचून उर्वरित मेंढ्यांवर औषधोपचार करताना पारोळ्यातील पशुधन अधिकारी व त्यांचे सहकारी.* (छायाचित्र : रजनीकांत पाटील)

या घटनेची माहिती मिळताच स्थानिक ग्रामस्थांसह पशुसंवर्धन विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ. भरतकुमार देसले, पशुधन विकास अधिकारी डॉ. भाग्यश्री केंद्रे, पशुधन विकास अधिकारी डॉ. करिष्मा तडवी, पशुधन पर्यवेक्षक प्रवीण इनकर, चेतन पाटील, वर्णोपचारक राजेंद्र पाटील, अनिल पाटील, पोलीसपाटील मनोज वानखेडे, सरपंच मनोहर माळी, तलाठी रामराव राठोड, कोतवाल महेंद्र पवार यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. तसेच १९२ मेंढ्यांवर औषधोपचार करण्यात आले असून, या घटनेचा संबंधितांनी पंचनामा केला आहे.

दरम्यान, या घटनेच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी कीटकनाशकांचा वापर करताना अधिक दक्षता घेणे गरजेचे असून, भविष्यात अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी योग्य उपाययोजना करण्याची आवश्यकता असल्याचे मत संबंधित अधिकाऱ्यांनी व्यक्त केले आहे.


## नाला सफाई रखडल्याने वाढला मच्छरांचा प्रकोप

### पालिकेच्या दुर्लक्षामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरात सध्या विविध भागांत घाणीचे साम्राज्य दिसून येत आहे. त्यात मोठा नाला व गटारांची अनेक दिवसांपासून पालिकेकडून सफाई न होत नसल्याने परिसरात मच्छरांचा प्रकोप मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

शहरातील विविध भागांतील नागरिकांच्या म्हणण्यानुसार गटारांमध्ये साचलेले घाण पाणी आणि कचरा हे मच्छर वाढण्याचे मुख्य कारण ठरत आहे. परिणामी लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहे. (पान २ वर)



*अमळनेर : शहरातील मोठ्या गटारींची साफसफाई होत नसल्याने अशा प्रकारे मोठ्या प्रमाणात घाण, कचरा साचलेला आहे.* (छायाचित्र : रजनीकांत पाटील)



*अमळनेर : तालुक्यातील वाघोदे येथील ग्रामस्थांनी पोलिस कन्या चैताली पाटील हिची गावातून काढलेली स्वागत मिरवणूक.*

## वाघोदेवासींकडून पोलिस कन्येची वाजतगाजत स्वागत मिरवणूक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील वाघोदे येथील चैताली रामकृष्ण पाटील हिची मुंबई पोलीस दलात निवड झाली आहे. ती नुकतीच नागपूर येथील प्रशिक्षण पूर्ण करून गावी परतली. त्यानंतर वाघोदेतील ग्रामस्थांनी चैतालीचे वाजतगाजत सवाद्य मिरवणूक काढून जोरदार स्वागत केले.

चैतालीचे आई-वडील मोलमजुरी करतात. जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर चैतालीने पोलीस पदापर्यंत मजल मारली आहे. गेल्या दोन वर्षांपूर्वी तिचा मोठा भाऊ पवनची भारतीय सैन्य दलात निवड झाली आहे. भाऊ देशाच्या रक्षणार्थ सीमेवर कर्तव्य बजावत असून, आता बहीण चैतालीही भावाच्या पावलावर पाऊल ठेवत मुंबईकरांच्या सेवेत आपले कर्तव्य बजावणार आहे. कुटुंबातील कोणी मोठ्या पदावर नसताना, आई-वडिलांची आर्थिक कुवत नसताना, फक्त अभ्यासाच्या आणि मेहनतीच्या जोरावर चैताली आणि तिच्या भावाने आजच्या तरुणाई पुढे आदर्श उभा केला आहे. फक्त मुलेच नव्हे, तर मुलीही आपल्या कुटुंबाचे नाव उज्ज्वल करू शकतात, हे चैतालीने दाखवून दिले आहे. तिचा आदर्श गावातील तरुणाईने घ्यावा, तसेच तिने वाघोदे गावाचे नाव उज्ज्वल केल्याने भाजपचे जानवे मंडळ अध्यक्ष जिजाबराव पाटील, दामू अण्णा पाटील, राहुल पाटील, हितेश पाटील व मयूर पाटील यांच्यासह ग्रामस्थांनी चैतालीची मिरवणूक काढली. तसेच आई-वडिलांचा सत्कार करून चैतालीला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## अमळनेर को-ऑप. अर्बन बँकेची शतकपूर्ती वर्षात ऐतिहासिक भरारी

### प्रथमच ११५ कोटींचा व्यवसाय करून केली प्रगतीची नोंद

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील शतकपूर्ती वर्ष साजरे करताना दि अमळनेर को-ऑप. अर्बन बँकेने भक्कम आर्थिक प्रगतीची नोंद करत नवा इतिहास घडविला आहे. बँकेने आपल्या शंभर वर्षांच्या प्रवासात प्रथमच ११५ कोटी रुपयांचा व्यवसाय करत आर्थिक क्षेत्रात मजबूत स्थान निर्माण केले आहे. या कामगिरीतून सक्षम व्यवस्थापन व नियोजनाची झलक दिसून येत आहे.

दि अमळनेर को-ऑप. अर्बन बँकेची स्थापना १५ एप्रिल १९२६ रोजी झाली असून, यंदा १५ एप्रिल २०२६ रोजी बँकेला १०० वर्षे पूर्ण होत आहेत. विशेष म्हणजे रिझर्व्ह बँकेच्या स्थापनेपूर्वीच या बँकेची स्थापना झाली होती, ही बाब तिच्या ऐतिहासिक परंपरेची साक्ष देते. शतकपूर्ती वर्षात बँकेने विविध आर्थिक निर्देशांकांमध्ये उल्लेखनीय सुधारणा साधली आहे. ढोबळ अकार्यक्षम खात्यांचे प्रमाण (एनपीए) ६.७५ टक्के, तर निव्वळ एनपीए १.९० टक्क्यांवर नियंत्रित ठेवण्यात यश आले आहे. थकबाकीचे प्रमाणही केवळ ६.१२ टक्क्यांवर राखण्यात आले आहे. बँकेची आर्थिक स्थिती भक्कम असल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होते. भागभांडवल ३७०.३० लाख रुपये, रिझर्व्ह ८४४.७८ लाख रुपये, एकूण ठेवी ६,७३०.६८ लाख रुपये, एकूण गुंतवणूक २,६९३.६४ लाख रुपये, तर कर्जवाटप ४,७५७.५८ लाख रुपये झाले आहे. एनपीए रक्कम ३२१.११ लाख रुपये असून, निव्वळ एनपीए ८६.११ लाख रुपये आहे. बँकेचा ढोबळ नफा ७१.३५ लाख रुपये असून रिझर्व्ह बँक, आयकर खाते व शासकीय नियमानुसार तसेच सर्व तरतुदी वजा केल्यानंतर निव्वळ नफा ५५ लाख ५५ हजार रुपये झाला आहे.



भरतकुमार ललवाणी



लक्ष्मण महाजन

ग्राहकाभिमुख सेवांवरही बँकेने विशेष भर दिला असून, सीटीएस क्लिअरिंग, मोबाईल बँकिंग, आरटीजीएस आणि एनईएफटी या सुविधा विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येत आहेत. आगामी तीन महिन्यांत यूपीआय व आयएमपीएससारख्या आधुनिक डिजिटल सुविधा सुरू करण्याचेही नियोजन आहे. या यशस्वी वाटचालीत बँकेचे अध्यक्ष भरतकुमार सुरेश ललवाणी, उपाध्यक्ष लक्ष्मण पांडुरंग महाजन, संचालक मोहन बाळाजी सातपुते, प्रवीण रामलाल जैन, पंडित रामचंद्र चौधरी, पंकज गोविंद मुंदडे, प्रदीपकुमार कुंदनलाल अग्रवाल, प्रवीण श्रीराम पाटील, अभिषेक विनोद पाटील, रणजित भास्कर शिंदे, दीपक छबूलाल साळी, वसुंधरा दशरथ लांडगे, मनीषा विवेकानंद लाठी, तज्ज्ञ संचालक ॲड. विनायक राजाराम पाटील, ॲड. विजय जगन्नाथ बोरसे, मुख्य कार्यकारी अधिकारी अमृत रामभाऊ पाटील यांच्यासह बजरंग अग्रवाल, कुंदनशेठ अग्रवाल, सुभाष ओंकार पाटील, बिपीन पाटील, निकुंभ नाना, सरजू गोकलाणी, विनोद पाटील, प्रकाश मुंदडा, अजय केले, आजी-माजी पदाधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे मोलाचे योगदान लाभले आहे. शतकपूर्ती वर्षात नोंदविलेली ही कामगिरी भविष्यातील प्रगतीसाठी प्रेरणादायी ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे.

### आजचे अभीष्टचिंतन



सौ. लीना उपाध्याय
अमळनेर



सौ. विद्या भावसार
अमळनेर



श्री. सुधाकर पाटील
बालाजी कृषी केंद्र



श्री. योगेश वंजारी
अमळनेर



श्री. योगेश पाटील
सेवेकरी, श्री मंगळग्रह मंदिर

बापाच्या घामाचे चीज झाले! ‘यूपीएससी’त शेतकरी पुत्राचा डंका पान ३ वर...

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेव्हा-तेव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!

## संपादकीय

# कार्यवाहीसाठी बडगा हवाच!

मार्च महिन्याचा शेवटचा आठवडा म्हणजे आर्थिक वर्षाची अखेर. बँका, वित्तीय संस्था, कॉर्पोरेट यांची हिशेब पूर्ण करण्याची घाई ३१ मार्च जवळ येतो तशी वाढत जाते. मात्र, या निमित्ताने सरकारच्या विविध खात्यांची वर्षाच्या सुरूवातीला अर्थसंकल्पाद्वारे मंजूर झालेला निधी खर्च करण्यासाठी शासन निर्णय जारी करण्याची धावपळ, याला 'काळा विनोद'च म्हणायला हवे. जनतेकडून करसंकलनाच्या माध्यमातून सरकार जनकल्याणासाठी ज्या योजना जाहीर करते त्यावर नियतव्यय म्हणून जो निधी अर्थसंकल्पात जाहीर होतो तो पूर्णपणे खर्च होत नसेल तर ही सरकारसाठी मोठीच नामुष्की म्हणायला हवी. गेल्या चार-पाच वर्षांची योजनांवरील खर्चाची आकडेवारी पाहिली तर ती साधारण ६० टक्क्यांच्या आसपास दिसते. याचाच अर्थ ४० टक्के निधी योजनांवर खर्च करण्याची सरकारची असमर्थता यातून दिसते. यंदाच्या आर्थिक वर्षात विविध योजनांवर ठरलेल्या निधीच्या केवळ ६० टक्केच खर्च करण्यात राज्य सरकार यशस्वी ठरले. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदाचा खर्च केवळ एखाद टक्क्याने वाढला आहे. सर्वाधिक खर्च हा महिला व बालकल्याण विभागाचा झाला असून तो जवळपास ८२ टक्क्यांच्या आसपास आहे. याचे कारण महिला व बालकल्याण विभागाच्या अंतर्गत येणारी 'लाडकी बहीण योजना'. सर्वाधिक कमी खर्च हा गृहनिर्माण विभागावर झालेला आहे. खरेतर सर्वाधिक शहरीकरण असलेल्या महाराष्ट्रात घरांची समस्या फार मोठी आहे. तरीही या विभागावर केवळ २२ टक्के सरकार खर्च होत असेल तर याला काय म्हणावे? याच पार्श्वभूमीवर आता मंत्रालयातील बाबूंचा उर्वरित ४० टक्के निधी कोणत्या ना कोणत्या चौकटीत बसवून खर्च करण्याचा आटापिटा सुरू आहे. रविवारी सुटी असतानाही शासन निर्णयांचे शतक सरकारने या निमित्ताने केले. सोमवारीदेखील मंजूर निधी खर्च करण्यासाठी शासन निर्णय जारी करण्याचा खटाटोप सुरूच होता.

एकीकडे राज्याचे मुख्यमंत्री प्रशासनात गतिमानता व पारदर्शकता यावी म्हणून प्रशासकीय यंत्रणेसाठी १०० दिवसांचा व नंतर १५० दिवसांचा कृती आराखडा राबविण्यासारखा स्तुत्य उपक्रम घेतात. त्या अंतर्गत प्रशासकीय अधिकाऱ्यांमध्ये जनताभिमुख कारभार करण्याची आपसात स्पर्धा व्हावी यासाठी पुरस्कार दिले जातात, तरीही मंजूर निधीच्या ६० टक्केच खर्च का होतो? सरकार कुणाचेही असो, प्रशासनातील आळस, कामाप्रति असलेला कंटाळा, जनतेच्या प्रश्नांप्रति नसलेली आपुलकी हीच यामागची कारणे आहेत. कोणताही प्रकल्प पूर्ण होण्यासाठी तीन वर्षांपेक्षा अधिक कालावधी लागती कामा नये, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी ठणकावून सांगितल्यानंतरही दरवर्षी निधी खर्च करण्यात प्रशासन असमर्थ ठरत असेल तर मुख्यमंत्र्यांनी ढिम्म प्रशासनाला जागे करण्यासाठी बडगा उगारणे गरजेचेच आहे. कंत्राटे देताना होणारी अनागोंदी हे देखील यामागील एक कारण. कंत्राटे देण्याचे काही निकष असले तरी प्रत्यक्षात ती देताना वेगळेच निकष लावले जातात. यामागे अर्थकारण व राजकारण या दोन्ही बाबी असतात. मात्र काहीही झाले तरी ठरलेले काम पूर्ण करणे इतकी किमान अपेक्षा कररूपाने सरकारी तिजोरी भरणाऱ्या जनतेची असते. सरकारी कामांच्या दर्जाबाबत जनता किती सहनशील आहे, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. मात्र कमी प्रतीची का असेना, जनोपयोगी कामे व्हायला हवीत, इतकीही किमान अपेक्षा जनतेने ठेवायची नसेल तर जनतेला लोकशाहीच्या सबळीकरणासाठी मतदान करण्याचे आवाहन कशासाठी करायचे?

अर्थसंकल्पाच्या सुरूवातीलाच सगळ्याच खात्यांच्या योजनांचा आढावा घेऊन अर्थसंकल्पात नियतव्यय काय असेल हे ठरवले जाते. सुमारे साडेसात लाख कोटी आकारमान असलेला महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पात विविध खात्यांना मिळालेला निधी कधीच पुरत नाही. विधिमंडळाच्या प्रत्येक अधिवेशनात यामुळेच अवाढव्य आकारमानाच्या पुरवणी मागण्या मंजूर करून घेतल्या जातात. सगळ्याच खात्यांच्या योजनांसाठी अर्थसंकल्पात मंजूर केलेला निधी पुरा पडत नाही व त्यामुळे पुरवणी मागण्या मंजूर करून घ्याव्या लागतात, तर या मंजूर झालेल्या निधीतील केवळ ६० टक्केच निधी प्रशासनाकडून खर्च होणे व त्यासाठी मार्चअखेर आला की शेवटच्या तीन चार दिवसांत काही ना काही कारणे देत शेकडो शासन निर्णय जारी करणे, हे सरकारच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करते. त्यामुळे आता तरी मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांना केवळ तंबी न देता त्यांच्यावर कारवाईचा बडगा उगारल्याशिवाय प्रशासनाला जाग येणार नाही, याची त्यांनी दखल घेतलेली बरी.

# जिल्ह्यातील अंगणवाड्या ३० जूनपर्यंत सकाळी ७ वाजता भरविल्या जाणार

## जि. प. सीईओंचा आदेश; अंगणवाडी युनियनच्या पाठपुराव्याला यश



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जळगाव जिल्ह्यातील उन्हाची तीव्रता लक्षात घेता सर्व अंगणवाडी केंद्रांच्या वेळेत आता बदल करण्यात आला आहे. त्यानुसार १ एप्रिल २०२६ पासून सर्व अंगणवाड्या सकाळ सत्रात भरविण्याचे आदेश जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल यांनी दिले आहेत. यासंदर्भात अंगणवाडी युनियनचे नेते रामकृष्ण पाटील यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता.

राज्यात उन्हाचा तडाखा दिवसागणिक वाढत आहे. त्यामुळे बालकांच्या आरोग्यावर त्याचे विपरीत परिणाम होऊ शकतात. हे लक्षात घेऊन अंगणवाडी केंद्रांच्या वेळेत बदल करण्याची मागणी युनियनतर्फे करण्यात आली होती. नवी मुंबईच्या एकात्मिक बालविकास सेवायोजनेच्या आयुक्तांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जिल्हा प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे. सदरचा बदल १ एप्रिल ते ३० जून २०२६ या कालावधीसाठी लागू राहणार आहे.

### अंगणवाडीचे नवे वेळापत्रक

अंगणवाडी सेविका व मदतनीसांचे कामकाज : सकाळी ७ ते ७.१५ अंगणवाडी उघडणे आणि पूर्वतयारी करणे. ७.१५ ते ८.१५ पूर्व शालेय शिक्षण. ८.१५ ते ८.३० लाभार्थ्यांना नाश्ता वाटप. ८.३० ते १०.१५ पुन्हा पूर्व शालेय शिक्षण उपक्रम. १०.१५ ते १०.४५ लाभार्थ्यांना गरम ताजा आहार वाटप. १०.४५ ते ११.३० पोषण ट्रॅकरवर नोंदी करणे व कार्यालयीन दप्तर पूर्ण करणे. ११.३० ते दुपारी १२ संदर्भ सेवा. १२ ते १.३० गृहभेटी, आरोग्य मार्गदर्शन, समुपदेशन आणि कुपोषित बालकांना आहार वाटप.

### सेविका, मदतनीसांना दिलासा

उन्हाळ्याच्या सुटीपूर्वीच वेळेत बदल झाल्यामुळे अंगणवाडी सेविका आणि मदतनीसांनी समाधान व्यक्त केले आहे. दुपारच्या उन्हात लहान मुलांना केंद्रात आणणे आणि घरी सोडणे पालकांसाठीही जिकिरीचे ठरत होते. युनियनने केलेल्या या यशस्वी पाठपुराव्याबद्दल श्री. पाटील यांचे सर्व स्तरांतून आभार मानले जात आहेत.

> बालकांचे आरोग्य आणि सेविकांची अडचण लक्षात घेऊन आम्ही हा प्रश्न जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे सातत्याने लावून धरला होता. त्यावर प्रशासनाने सकारात्मक निर्णय घेतल्यामुळे जिल्ह्यातील हजारो बालकांना आणि अंगणवाडी कर्मचाऱ्यांना दिलासा मिळाला आहे.
>
> **– रामकृष्ण पाटील, युनियन नेते, जळगाव.**

# बोहऱ्यात खोदकामावेळी स्फोट; घर जमीनदोस्त

## संपूर्ण कुटुंब उघड्यावर; ग्रामसभेचा ठराव कूचकामी



*अमळनेर : तालुक्यातील बोहरा येथे बुधवारी उपसा सिंचन योजनेच्या पाइपलाइनसाठी खोदल्या जाणाऱ्या चारीसाठी स्फोट करण्यात आला. या स्फोटात जमीनदोस्त झालेले घर व संबंधित कुटुंबीय.*

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील बोहरा येथे उपसा सिंचन योजनेच्या पाइपलाइनसाठी खोदल्या जाणाऱ्या चारीसाठी स्फोट करण्यात आला. या स्फोटात एका गरिबाचे घर जमीनदोस्त होऊन संपूर्ण कुटुंबच उघड्यावर आले आहे. दिलीप बुधा भिल असे घरमालकाचे नाव असून, सुदैवाने घटनेवेळी घरात कोणी नसल्याने मोठा अनर्थ टळला.

निम्न तापी प्रकल्प पाडळसे धरणाच्या उपसा सिंचनासाठी बोहरा गावाबाहेरून मुख्य पाइपलाइन टाकण्याचे काम सुरू आहे. यासाठी खोल चारी खोदावी लागत आहे. बऱ्याच ठिकाणी दगड लागत असल्याने जिलेटीनसारख्या स्फोटक पदार्थांचा वापर करून स्फोट करावे लागतात. १ एप्रिल रोजी दिलीप भिल यांच्या घरापासून काही अंतरावर स्फोट करण्यात आले. त्यामुळे त्यांचे संपूर्ण घर कोसळले. यापूर्वीही अनेकदा घरांना भूकंपासारखे धक्के बसल्यामुळे ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. घर जमीनदोस्त झाल्याने संपूर्ण कुटुंब उघड्यावर आले आहे. गावकऱ्यांनी त्यांना तात्पुरता आसरा दिला आहे. घटनास्थळी संबंधित अधिकाऱ्यांनी पंचनामा केला असून, कुटुंबाला संपूर्ण नुकसान भरपाई मिळण्याची मागणी होत आहे.

ग्रामसभेचा ठराव हा सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशापेक्षा मोठा असतो. त्यामुळे गावातील ग्रामसभेत उपसा सिंचन योजनेच्या कामासाठी करण्यात येणारे स्फोट थांबविण्यात यावेत व नुकसानग्रस्तांना योग्य पुनर्वसन व मोबदला मिळावा, असा ठराव करण्यात आला असूनही त्या ठरावाला केराची टोपली दाखविण्यात आली.



# अत्यंत वेगाने उडणारा पक्षी

### पक्ष्यांची ओळख

**नाव :** पाकोळी किंवा भिंगरी Swallow

**रंग :** स्वॅलो पक्ष्याचे पंख वरून निळसर काळे, पोट व छाती पांढरी, कपाळ डोके नारिंगी, शेपूट काळी लांब.

**चोच :** रुंद, लहान, टोकदार, काळी.

**डोळे :** गोल लहान काळे. आधुनिक लेन्सपेक्षा दहा हजार पट शक्तिशाली.

**घरटे :** स्वॅलो ओला लिखलाच्या सहाय्याने पुलांच्या खाली, ओसाड इमारतींच्या छताखाली घरटे बांधतात. हे पक्षी जंगलात न राहता मानवी वस्तीजवळ राहतात. बांधलेल्या शेकडो घरट्यांना दुरुस्त करून पुन्हा तेथे राहतात.

**अंडी :** मादी एप्रिल, मे महिन्यात तीन-चार अंडी घालते. ही अंडी लहान, पांढरी, लंबवर्तुळाकार असतात.

**भक्ष :** स्वॅलो हवेत उडताना हवेतील कीटक खातात. हवेत माशा, फुलपाखरे, कीटकांची वेगात शिकार करतात.

**आवाज :** स्वॅलो उडताना चिर् चिर् आवाज करतात. हा आवाज पाच-दहा सेकंद चालतो. प्रणयराधन करताना हे आवाज मोठ्या प्रमाणावर ऐकू येतात. काही वेळा ट्विट ट्विट आवाज करतात.

**इतर वैशिष्ट्ये :** स्वॅलो नर-मादी वर्षानुवर्षे जोडीने राहतात. स्वॅलोची शेपूट उठून दिसणारी आहे. त्यातून दोन तार निघालेले असतात. यामुळे यांना तारवाली सुद्धा म्हणतात. स्वॅलो अत्यंत वेगाने उडणारे चपळ पक्षी होत. हे पक्षी भारतभर आढळतात. अमळनेरमध्ये दगडी दरवाजा, अंदरपुरा, बोरी नदीवर असलेल्या विजेच्या तारा येथे या पक्ष्यांचे थवे हमखास दिसून येतात.

**संग्राहक :**
**प्रा. प्रकाश धर्माधिकारी, निसर्ग मित्रमंडळ, अमळनेर.**

'यिन'ची निवडणूक

# गौरव पाटीलची अध्यक्षपदी बिनविरोध निवड

## खा. शि. मंडळाच्या फार्मसी महाविद्यालयात आनंदोत्सव



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील खानदेश शिक्षण मंडळाच्या औषधनिर्माणशास्त्र अर्थात फार्मसी महाविद्यालयात नुकतीच यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्क (यिन) अंतर्गत निवडणूक झाली. यामध्ये गौरव रवींद्र पाटील याची अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. त्याच्या या निवडीमुळे महाविद्यालयीन परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

गौरव हा तालुक्यातील आमोदे येथील रवींद्र मुरलीधर पाटील यांचा सुपुत्र आहे. गौरव हा अभ्यासू, शांत स्वभावाचा आणि नेतृत्वगुणांनी परिपूर्ण विद्यार्थी म्हणून ओळखला जातो. विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांमध्ये त्याने आजवर सक्रिय सहभाग नोंदविला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये त्याची लोकप्रियता मोठी आहे. गौरवची अध्यक्षपदाची बिनविरोध निवड जाहीर होताच मित्र परिवार, प्राध्यापक आणि महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांकडून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव करण्यात आला.

दरम्यान, पुढील काळात विद्यार्थ्यांच्या समस्या सोडविणे, शैक्षणिक वातावरण अधिक सक्षम करणे आणि विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणे, हेच माझे उद्दिष्ट असल्याची प्रतिक्रिया गौरवने व्यक्त केली आहे.

# बँकेला मराठीत काय म्हणतात?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतातील जवळपास ९० टक्के नागरिकांकडे बँक खाते आहे. आपले पैसे सुरक्षित राहावेत, यासाठी आपण बँकेत पैसे साठवतो. मात्र बँकेला मराठीत काय म्हणतात हे माहिती आहे का?

**व्यवहार्य शब्द :** मराठी भाषेत 'बँक' या शब्दाचाच सर्वाधिक वापर केला जातो. मराठी व्याकरण आणि दैनंदिन संभाषणात हा शब्द पूर्णपणे स्वीकारला गेला आहे.

**तांत्रिक किंवा औपचारिक शब्द :** अत्यंत शुद्ध किंवा शासकीय परिभाषेत बँकेला 'अधिकोष' असे म्हटले जाते. मात्र, हा शब्द व्यवहारात खूप कमी ऐकायला मिळतो.

**वित्तीय संज्ञा :** व्यापक अर्थाने बँकेला 'वित्त संस्था' असेही संबोधले जाते. कारण तेथे पैशांचे (वित्ताचे) व्यवहार चालतात.

**ऐतिहासिक संदर्भ :** जुन्या काळात किंवा आजही छोट्या स्वरूपाच्या खासगी बँकिंग व्यवहारांना 'पेढी' (उदा.- सराफी पेढी) असे म्हटले जाते.

**बँकेचे मुख्य कार्य :** बँक ही अशी संस्था आहे जी लोकांकडून ठेवी स्वीकारते आणि गरजू व्यक्तींना किंवा उद्योगांना कर्ज पुरवते.

# नाला सफाई रखडल्याने वाढला मच्छरांचा प्रकोप

पान १ वरून...

अनेक मुले ताप व इतर आजारांनी त्रस्त आहेत. या समस्येबाबत पालिकेला अनेकवेळा कळवूनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही, अशी नाराजी नागरिकांनी व्यक्त केली आहे. नाल्यांची नियमित सफाई आणि मच्छर नियंत्रणासाठी औषध फवारणी न झाल्याने परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर बनत आहे. प्रशासनाने तत्काळ स्वच्छता मोहीम राबवून गटारांची सफाई व दुरुस्ती करावी तसेच मच्छर नियंत्रणासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शहरवासीयांकडून होत आहे. यासंदर्भात वेळेत उपाययोजना न केली गेल्यास ही समस्या मोठ्या स्वरूपात आरोग्याचे प्रश्न निर्माण करू शकते, असा इशाराही नागरिकांनी दिला आहे. दरम्यान, लवकरात लवकर कारवाई न झाल्यास सामूहिक आंदोलन छेडण्याचा इशाराही नागरिकांनी दिला आहे.



*अमळनेर : हनुमान जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमाप्रसंगी उपस्थित शिवाजीनगर, हनुमाननगरातील नागरिक.*

# शिवाजीनगर, हनुमाननगरात हनुमान जयंतीचा कार्यक्रम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील शिवाजीनगर व हनुमाननगरात हनुमान जयंतीनिमित्त गुरुवार, दि. २ एप्रिल रोजी जय हिंद व्यायामशाळेत माजी नगरसेवक प्रताप शिंपी यांच्या हस्ते हनुमानजींची विधिवत आरती करण्यात आली. यावेळी परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. तसेच हनुमाननगर येथेही हनुमानजींच्या फलकाचे अनावरण श्री. शिंपी यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास स्थानिक नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. बंटी प्रकाश चौधरी, कैलास पाटील, सचिन सुधाकर महाजन, विकी शशी कासार यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. यावेळी महिलांसह अनेक भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**अमळनेर : येथील महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या तालुकाध्यक्षपदी डॉ. समाधान मैराळे यांची पुनश्च निवड करण्यात आली आहे. डॉ. मैराळे यांच्या या निवडीचे संघटनेने स्वागत केले असून, त्यांचे अभिनंदन केले आहे. दै. 'ग्लोबल महातेज परिवारा'तर्फे त्यांना मंगलमय शुभेच्छा!**

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# बापाच्या घामाचे चीज झाले! ‘यूपीएससी’त शेतकरी पुत्राचा डंका

## छत्रपती संभाजीनगरमधील प्रज्वल पोळची गरुड झेप

सक्सेस स्टोरी



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ग्रामीण भागातील मातीचा सुगंध आणि कष्टाची ओढ असलेल्या एका तरुणाने देशातील सर्वांत कठीण मानल्या जाणाऱ्या परीक्षेत आपल्या यशाचा झेंडा रोवला आहे. गंगापूर तालुक्यातील शंकरपूर येथील एका सामान्य शेतकरी कुटुंबातील मुलाने यूपीएससी परीक्षेत ४३४ वी रँक मिळवून प्रशासकीय सेवेचे आपले स्वप्न सत्यात उतरवले आहे. प्रज्वलचे हे यश म्हणजे केवळ एका तरुणाची प्रगती नसून, शेतात राबणाऱ्या एका बापाच्या कष्टाला मिळालेली ही सर्वांत मोठी पावती आहे. प्रज्वल राजू पोळ असे यूपीएससी परीक्षेत ४३४ वी रँक मिळविलेल्या तरुणाचे नाव आहे.

**प्रज्वलचे गाव आणि कौटुंबिक पार्श्वभूमी**

प्रज्वल पोळ हा छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील शंकरपूर (ता. गंगापूर) येथील मूळ रहिवासी आहे. त्याचे वडील राजेंद्र पोळ हे व्यवसायाने शेतकरी आहेत. शेतीसोबतच ते लासूर बाजारपेठेतील कृषी सेवा क्षेत्रातील एक ज्येष्ठ व्यापारी म्हणूनही ओळखले जातात. एका शेतकरी कुटुंबातून आल्यामुळे प्रज्वलला कष्टाची आणि संघर्षाची जाणीव बालपणापासूनच होती. प्रज्वलचे कुटुंब मध्यमवर्गीय असून त्याचे वडील शेती आणि व्यापाराच्या माध्यमातून घराचा गाडा हाकतात. ग्रामीण भागातील वातावरण आणि शेतीवर अवलंबून असलेल्या परिस्थितीमध्ये यूपीएससीसारख्या कठीण परीक्षेची तयारी करणे हे एक मोठे आव्हान होते. मात्र, राजेंद्र पोळ यांनी आपल्या मुलाच्या शिक्षणासाठी आणि स्वप्नांसाठी सदैव पाठबळ दिले. प्रज्वलनेही घरच्या परिस्थितीचे भान राखून कोणत्याही महागड्या खासगी क्लासेसचा अट्टहास न धरता, स्वतःच्या जिद्दीवर अभ्यास पूर्ण केला.

**आयकर अधिकारी म्हणून निवड**

प्रज्वलचा हा प्रवास जिद्द आणि सातत्याने भरलेला आहे. त्याने कोणत्याही मोठ्या खासगी क्लासचे साहाय्य न घेता, केवळ स्वतःच्या मेहनतीवर विश्वास ठेवला. वयाच्या २५ व्या वर्षी प्रज्वलने मिळवलेले हे यश ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांसाठी आशेचा नवा किरण ठरत आहे. त्याच्या या घवघवीत यशामुळे आता त्याची भारतीय महसूल सेवा म्हणजेच आयकर अधिकारी या पदावर निवड निश्चित मानली जात आहे.

आपल्या यशाबद्दल बोलताना प्रज्वल भावूक होतो. त्याने अभ्यासाचे मोजके तास मोजण्याऐवजी अभ्यासाची गुणवत्ता आणि सातत्यावर लक्ष दिले. दररोज ९ ते १० तास मनापासून अभ्यास करताना त्याने दोन स्तरांवर नियोजन केले होते. सुरुवातीला अभ्यासक्रम आणि मागील वर्षांचे प्रश्न नीट समजून घेतले आणि त्यानंतर नियमित रिव्हिजन आणि उत्तरलेखनाच्या जोरावर स्वतःला सिद्ध केले. पुस्तके आणि मागील वर्षांच्या प्रश्नांच्या सरावावर त्याने सर्वाधिक भर दिला.

# ‘दस रुपये वाले डॉक्टर’ का सफर: एक असली हीरो की कहानी



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पट्टुकोट्टई (तमिलनाडु) के रहने वाले डॉ. टी. ए. कनगरथिनम अब हमारे बीच नहीं रहे। ९६ साल की उम्र में उनका निधन हो गया। लोग उन्हें प्यार और इज्जत से ‘१० रुपये वाला डॉक्टर’ कहते थे। उनके जीवन की कुछ खास बातें जो उन्हें महान बनाती हैं।

**सस्ती सेवा :** पिछले ६० सालों से ज्यादा समय तक उन्होंने लोगों का इलाज किया। १९९० से वे फीस के तौर पर सिर्फ १० रुपये लेते थे। अगर कोई बहुत गरीब होता, तो उसका इलाज मुफ्त में करते थे।

**हजारों बच्चों का जन्म :** उन्होंने १९५० के दशक में काम शुरू किया था। वे करीब ५० गांवों के लोगों के लिए मसीहा थे और हजारों बच्चों का जन्म उन्हीं की देखरेख में हुआ।

**बड़ा दिल :** सिर्फ डॉक्टरी ही नहीं, इंसानियत में भी उनका कोई मुकाबला नहीं था। कोरोना के मुश्किल समय में, उन्होंने अपने किरायेदारों का करीब ७९ लाख रुपये का किराया माफ कर दिया था।

पिछले ५ सालों से वे बिस्तर पर थे, लेकिन उनका जीवन हमें सिखाता है कि पैसा ही सब कुछ नहीं होता, इंसानियत और सेवा सबसे बड़ी है। ऐसे महान इंसान को हमारा सलाम।

# या झाडाची पाने म्हणजे झुरळांचे कट्टर शत्रू

## घरात आणल्यास झुरळ लगेच जातील पळून!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

घरात असलेला कढीपत्ता झुरळ घरातून घालण्यासाठी खूप उपयोगी पडू शकतो. कढीपत्त्याचा उपयोग कसा करायचा? ते जाणून घेऊ या. हा उपाय करण्यासाठी कसलेही पैसे खर्च करण्याची गरज नाही.

कॉकरोच म्हणजेच झुरळ साधारण प्रत्येक घरात दिसतो. घरात सामानाची गर्दी झाली की समजा तिथे झुरळ होणारच. एकदा का घरात झुरळ झाले की नंतर मात्र फारच डोकेदुखी वाढते. हा त्रास होऊ नये म्हणून अनेकजण वेगवेगळे उपाय करतात. विशेष म्हणजे झुरळ हे अन्नात, भांडे, कपडे अशा सर्वच ठिकाणी जातात. त्यामुळे जास्तच मनस्ताप होतो. हीच अडचण होऊ नये यासाठी काही खबरदारी घेणे गरजेचे आहे. काही लोक घरातील झुरळ नाहीसे व्हावेत, यासाठी हजारो रुपये खर्च करतात. परंतु तमच्या भाजीपाल्यातील कढीपत्त्याच्या मदतीने तुम्ही झुरळांचा नायनाट करू शकता. कढीपत्याची पाने रगडून ज्या ठिकाणी झुरळ आहेत, त्या ठिकाणी ही पाने टाकल्यावर झुरळ पळून जातात.

काही लोक घरातील झुरळ नाहीसे व्हावेत यासाठी हजारो रुपये खर्च करतात. परंतु तमच्या भाजी-पाल्यातील कढीपत्त्याच्या मदतीने तुम्ही झुरळांचा नायनाट करू शकता. कढीपत्याची पाने रगडून ज्या ठिकाणी झुरळ आहेत, त्या ठिकाणी ही पाने टाकल्यावर झुरळ पळून जातात. या पर्यायाचा अवलंब केल्यास तुमच्या घरातील झुरळ निघून जातात. झुरळांना कढीपत्त्याचा वास आवडत नाही. त्यामुळेच ते घरातून काढता पाय घेतात. घरातील झुरळं घालवण्यासाठी



इतरही काही घरगुती उपयांचा अवलंब करता येऊ शकतो. या पर्यायाचा अवलंब केल्यास तुमच्या घरातील झुरळ निघून जातात. झुरळांना कढीपत्त्याचा वास आवडत नाही. त्यामुळेच ते घरातून काढता पाय घेतात. घरातील झुरळ घालवण्यासाठी इतरही काही घरगुती उपयांचा अवलंब करता येऊ शकतो.

# २०१७ मधील एक चूक आणि हिरो बनला झिरो!

## अभिनेता गोविंदाचे करिअरच संपले, कमबॅक करणेही झाले मुश्कील

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बॉलिवूडचा हिरो नंबर १ गोविंदा ज्याच्या फक्त नावानेच फिल्म हिट व्हायच्या. आता त्याच्यासोबतचे कलाकार आपली जादू करत असताना गोविंदाचा जलवा मात्र गेल्या ९ वर्षांत फिका पडला आहे. याचे कारण आहे त्याच्याकडून झालेली फक्त एक चूक.

बॉलिवूडचा हिरो नंबर १ अशी गोविंदाची ओळख. ९० च्या दशकात गोविंदाची जादू होती. त्याच्यासमोर खान आणि कपूरही फिके पडत होते. पण काही वर्षांनी नशिबाने वेगळाच डाव साधला. ९ वर्षांपूर्वी बॉक्स ऑफिसवर असा टर्निंग पॉइंट आला, की ज्यामुळे गोविंदाची शानदार कारकीर्द जवळजवळ संपुष्टात आली.


२०१४-१५ चा तो काळ. गोविंदाने ‘किल दिल’ आणि ‘हॅपी एंडिंग’सारख्या चित्रपटांमध्ये सहाय्यक भूमिका साकारल्या. ज्यांना चांगला प्रतिसाद मिळाला. पण त्याच्यातील मेन हिरो जीवंत होता. त्याला सहाय्यक भूमिका साकारण्यात आनंद वाटत नव्हता.

२०१७ मध्ये त्याने ‘आ गया हिरो’ या फिल्मद्वारे मेन हिरो म्हणून कम चित्रपटाद्वारे भव्य पुनरागमनाची योजना आखली होती. त्याने स्वतः या चित्रपटाची निर्मिती आणि प्रसिद्धी केली. गोविंदाने ९० च्या दशकातील तोच जुना फॉर्म्युला, तेच भडक रंगांचे कपडे आणि त्याच जुन्या पद्धतीचे ॲक्शन सीक्वेन्स आणले. जे पूर्णपणे कालबाह्य वाटत होते. कारण २०१७ मधील प्रेक्षकवर्ग बदलला होता. त्यामुळे हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर सपशेल अपयशी ठरला.

या फिल्मनंतर त्याने कमी बजेटच्या चित्रपटांमध्ये काम करायला सुरूवात केली, तेही फक्त फेल ठरले नाहीत तर गोविंदाची प्रतिष्ठाही कमी केली. काळानुसार स्वतःला न बदलणे ही गोविंदाची सर्वांत मोठी चूक होती. अनिल कपूर आणि संजय दत्त असे गोविंदाचे सहकलाकार त्यांच्या वयाला साजेशा गंभीर आणि दमदार भूमिका निवडत असताना गोविंदाने २५ वर्षांच्या तरुणाची भूमिका साकारण्याचा हट्ट धरला. असे म्हणतात, की त्याने फिल्ममध्ये फक्त लीड रोल नसल्याने अनेक मोठे प्रोजेक्ट्स नाकारले. त्याची ‘नाही’ म्हणण्याची आणि सेटवर उशिरा येण्याची सवय मोठ्या दिग्दर्शकांना त्याच्यापासून दूर घेऊन गेली.

२००७ या वर्षातील ‘पार्टनर’ हा चित्रपट गोविंदाच्या कारकिर्दीतील शेवटचा मोठा ब्लॉकबस्टर चित्रपट होता. सलमान खानसोबतची त्याची जोडी प्रचंड यशस्वी ठरली होती. सलमान-गोविंदाची ही जोडी पुढेही टिकेल अशी आशा होती, पण मीडिया रिपोर्टनुसार परस्पर मतभेद आणि व्यावसायिक वादामुळे ही जोडी तुटली. त्यानंतर गोविंदा एकटा पडला. इंडस्ट्रीतील गटबाजीच्या या काळात मोठ्या बॅनरच्या पाठिंब्याशिवाय गोविंदाचा संघर्ष अधिकच कठीण झाला. पुनरागमन करण्याचा प्रयत्न करत असताना गोविंदा वारंवार वादांमध्ये अडकला. कधी त्याचा भाचा कृष्णा अभिषेकसोबतचे कौटुंबिक भांडण, तर कधी ज्येष्ठ दिग्दर्शकांविरुद्ध केलेली त्याची कठोर टीका. या वादांमुळे त्याची प्रतिमा वादग्रस्त व्यक्तीमध्ये बदलली. प्रेक्षक त्याला चित्रपटांपेक्षा डान्स रिॲलिटी शोमधील परीक्षक म्हणून अधिक पाहू लागले, ज्यामुळे त्याच्या चित्रपटसृष्टीतील स्टारडम आणखी कमी झाले.

आता त्याचं बॉलिवूडमध्ये पुनरागमन अशक्य वाटते आहे.





एआय इमेज

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

‘तुझ्या या फाटक्या कपड्यांमुळे मला सासरी लाज वाटते!’ लेकीने बापाला हाकलले... पण ४ वर्षांनी जेव्हा मुलाची शाळेची फी भरायला ती रडत गेली, तेव्हा ‘ते’ सत्य बघून लेक रस्त्यावरच ढसाढसा रडली...

सोलापूरच्या जुन्या बाजारात ‘आप्पांची’ एक छोटीशी शिलाई मशीनची (टेलरिंगची) दुकान होती. बायको वारल्यानंतर आप्पांनी रात्रंदिवस लोकांचे फाटके कपडे शिवून आपली एकुलती एक लेक, ‘स्नेहा’ हिला पुण्यात इंजिनिअरिंगला शिकवले. स्नेहा अतिशय हुशार होती, तिला पुण्यात एका चांगल्या कंपनीत नोकरी लागली.

तेथेच तिची ओळख ‘विशाल’ नावाच्या मुलाशी झाली. विशाल पुण्यातल्या एका श्रीमंत घरचा मुलगा होता. आप्पांनी आपल्या आयुष्याची सर्व पुंजी लावून स्नेहाचं लग्न विशालशी लावून दिलं. स्नेहा आता मोठ्या घरातली सून झाली होती.

**तो अपमानाचा दिवस आणि लेकीचा खोटा स्टँडर्ड**

लग्नानंतर दोन वर्षांनी स्नेहाचे ‘डोहाळे जेवण’ पुण्याच्या एका मोठ्या हॉटेलमध्ये होते. सासरचे सर्व हायफाय पाहुणे आले होते. आप्पा एसटी बसने सोलापूरहून पुण्याला आले. त्यांच्या अंगावर साधे, विटलेले कपडे होते आणि हातात लेकीसाठी एका पिशवीत साधीशी ‘सुती साडी’ होती. जेव्हा आप्पा हॉलमध्ये आले तेव्हा विशालच्या नातेवाईकांनी त्यांना बघून नाक मुरडले. स्नेहाला आपल्या बापाची तेथे खूप लाज वाटली. तिने आप्पांना बाजूला नेले आणि अत्यंत रागाने म्हणाली, की ‘आप्पा, तुम्हाला किती वेळा सांगितले असे भिकाऱ्यासारखे कपडे घालून माझ्या सासरी येऊ नका म्हणून? माझे सासू-सासरे आणि मित्र मला हसतायत. तुमची ती ५०० रुपयांची साडी तुम्हीच ठेवा. यापुढे माझ्या घरी येण्याची काहीच गरज नाही, माझी इज्जत जाते.’ लेकीचे ते विषारी शब्द ऐकून आप्पांच्या काळजाचे तुकडे झाले. ते काहीच बोलले नाहीत, मुकाट्याने ती साडीची पिशवी घेऊन ते सोलापूरला परत गेले. स्नेहाने त्यानंतर ४ वर्षे बापाला कधीच फोन केला नाही.

**नशिबाचा खेळ आणि संकटांचा डोंगर**

चार वर्षांनंतर नशिबाने असा काही खेळ मांडला की विशालला व्यवसायात प्रचंड मोठा तोटा झाला. कर्जबाजारीपणामुळे त्यांचे मोठे घर विकले गेले. विशालला दारूचे व्यसन लागलं आणि एके दिवशी तो स्नेहा आणि त्यांच्या ३ वर्षांच्या मुलाला, ‘आरवला’ वाऱ्यावर सोडून पळून गेला. एकेकाळी श्रीमंतीचा माज असणाऱ्या स्नेहाला आता एका छोट्याशा भाड्याच्या खोलीत राहावे लागत होते. ती एका दुकानात सेल्सगर्ल म्हणून काम करू लागली. घरभाडे आणि मुलाचा खर्च यात तिची ओढाताण होत होती.

**तो अश्रूंचा महापूर आणि अंगावर काटा आणणारे सत्य**

आरव आता ५ वर्षांचा झाला होता आणि तो एका शाळेत जात होता. एके दिवशी स्नेहाला शाळेतून प्रिन्सिपलचा फोन आला. ‘स्नेहा मॅडम, तुमच्या मुलाची ३० हजार रुपये फी अजून भरायची बाकी आहे. उद्या फी भरली नाही, तर त्याला शाळेतून काढावे लागेल.’ स्नेहाकडे खिशात ५०० रुपयेही नव्हते. ती रात्रभर रडत होती. दुसऱ्या दिवशी सकाळी ती रडत रडत प्रिन्सिपलच्या केबिनमध्ये गेली. हात जोडून गयावया करू लागली, की ‘मॅडम, मला थोडी मुदत द्या. माझा नवरा सोडून गेलाय, माझ्याकडे पैसे नाहीत. माझ्या पोराचे शिक्षण थांबू देऊ नका.’ प्रिन्सिपल मॅडमने शांतपणे स्नेहाकडे बघितले आणि म्हणाल्या, की ‘स्नेहा, तू का रडते आहेस? तुझ्या मुलाची या वर्षाची ३० हजार फी आज सकाळीच भरली गेली आहे... आणि पुढच्या वर्षाचीही ॲडव्हान्स जमा झाली आहे.’ स्नेहाला धक्काच बसला. ‘काय? पण कोणी भरली माझी फी?’ प्रिन्सिपल मॅडमच्या डोळ्यांत पाणी आलं. त्या स्नेहाला घेऊन केबिनच्या खिडकीजवळ गेल्या आणि त्यांनी शाळेच्या बाहेरच्या गेटकडे बोट दाखविले. ‘ते बघ बाहेर... शाळेच्या गेटबाहेर कडक उन्हात झाडाखाली जो एक म्हातारा माणूस फाटके कपडे शिवत बसलाय ना... तो माणूस गेले सहा महिने रोज तेथे बसतोय. शाळेतल्या पोरांच्या फाटलेल्या बॅगा, वह्यांचे कव्हर शिवून जे काही १०-२० रुपये मिळतात, ते गोळा करून तो रोज माझ्याकडे आणून देतो.’ स्नेहाचा श्वास कोंडला गेला. तिने खिडकीतून बाहेर बघितले... आणि तिच्या पायाखालची जमीनच सरकली. कडक उन्हात, जुना चष्मा लावून, एका फाटक्या सतरंजीवर तिचे ‘आप्पा’ बसले होते. मॅडम रडत पुढे म्हणाल्या, की ‘त्या म्हाताऱ्याने मला हात जोडून सांगितले होते- ‘मॅडम, माझ्या लेकीला सांगू नका की मी येथे बसतो. तिला माझ्या फाटक्या कपड्यांची लाज वाटते, ती मला बघून निघून जाईल. माझा जावई सोडून गेलाय हे मला गावातल्या लोकांकडून समजले. माझ्या लेकीला गरिबीची सवय नाही, पण माझ्या नातवाचे शिक्षण थांबू नये म्हणून मी हे उरलेले आयुष्य येथेच या शाळेच्या गेटबाहेर काढीन.’

**अहंकाराचा शेवट**

ते शब्द ऐकताच स्नेहा वेड्यासारखी केबिनमधून बाहेर पळाली. ती थेट शाळेच्या गेटबाहेर गेली आणि भर रस्त्यात, लोकांसमोर आप्पांच्या गळ्यात पडून ढसाढसा रडू लागली. ‘आप्पा... मला माफ करा आप्पा. मी पैशाच्या माजात आंधळी झाले होते. ज्या बापाची मला लाज वाटत होती, त्याच बापाने आज माझ्या पोराचे भविष्य वाचविले... आप्पा, मला नका सोडून जाऊ.’ आप्पांनी आपल्या थरथरणाऱ्या हातांनी लेकीचे डोळे पुसले आणि तिला घट्ट जवळ घेतले. कारण पैशाची श्रीमंती संपते, पण बापाचे प्रेम कधीच संपत नसते. आई-वडिलांच्या साध्या राहणीमानाची सासरी लाज वाटणाऱ्या आजच्या पिढीच्या काळजाला थेट भिडणारी ही कथा तुम्हाला कशी वाटली?

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरूम

सीमा हॅण्डलूम हॉउस पारोळा रोड, धुळे





# हनुमान चालीसा की बजरंग बाण यामध्ये फरक काय?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बजरंग बाण आणि हनुमान चालीसा हे एकाच देवाला समर्पित आहेत, तरी त्या दोघांमध्ये फरक आहे. दोघांचा उद्देश, रचना, शैली आणि ऊर्जा वेगवेगळी आहे. हनुमान चालीसामध्ये हनुमानजींची स्तुती अगदी सौम्य आणि मधुर चौपाईंद्वारे करण्यात आलेली आहे. तर बजरंग बाण हा अत्यंत शक्तिशाली मंत्र मानला जातो, जो नकारात्मक शक्तींविरुद्ध संरक्षण देण्याचे काम करतो. यावरूनच समजले असेल, की बजरंग बाण आणि हनुमान चालीसा या दोन्हींमध्ये फरक आहे. चला तर या दोन्ही स्तोत्रांतील फरक अधिक स्पष्टपणे समजून घेऊया.




### बजरंग बाण-हनुमान चालीसामधील फरक

बजरंग बाणामध्ये अनेक बीज मंत्रांचा समावेश आहे, याचा उपयोग केवळ तंत्र-मंत्रापुरता मर्यादित नसून, ते एक सुरक्षाकवच देखील आहे. बीज मंत्रांनी तयार झालेले हे स्तोत्र अतिशय प्रभावी मानले जाते आणि ते एखाद्या शस्त्रा प्रमाणे कार्य करते अशी धारणा आहे. तर हनुमान चालीसाचा पाठ कोणीही, कधीही वाचू शकतो, पण बजरंग बाणचा पाठ करताना मन स्थिर, शुद्ध आणि मजबूत असणे आवश्यक आहे. बजरंग बाण वाचण्याची एक खास वेळ असते, कोणत्याही वेळी किंवा तुमच्या मनात आले म्हणून तुम्ही बजरंग बाण वाचले असे होत नाही. हनुमान चालीसाद्वारे आपण हनुमानजींची भक्ती करतो, तर बजरंग बाणाद्वारे मनोकामना पूर्ण करण्यासाठी आपण रामभक्त हनुमान यांची प्रार्थना केली जाते.

### हनुमान चालीसा

हनुमान चालीसाची रचना १६ व्या शतकात गोस्वामी तुलसीदास यांनी केली. त्यामध्ये ३ दोहे आणि ४० चौपाई आहेत. हनुमान चालीसा ही हनुमानजी यांच्या गुणांचे आणि त्यांच्या दिव्य कार्याचे वर्णन करते. जेव्हा तुम्ही हनुमान चालीसा वाचता तेव्हा एकप्रकारे शांती, समाधान मिळते तसेच नकारात्मक शक्ती किंवा काही समस्या असल्या तर त्यापासून संरक्षण मिळते. तुमची आध्यात्मिक उन्नती होते असे मानले जाते. या स्तोत्राची सुरुवात राम आणि सीता यांच्या स्मरणाने केली जाते कारण हनुमानजी हे श्रीरामांचे सर्वात निष्ठावान सेवक मानले जातात. जेव्हा भक्तगण हनुमान चालीसाचे पठण करतात त्यावेळी भक्तांचा उद्देश हनुमानजींचे आशीर्वाद, संरक्षण आणि शक्ती मिळवणे हाच असतो.

### बजरंग बाण

बजरंग बाण देखील गोस्वामी तुलसीदास यांनीच रचलेले आहे, परंतु हा एक अत्यंत शक्तिशाली मंत्र मानला जातो. यात बजरंगबली हनुमान यांच्याकडे संरक्षण आणि नकारात्मक शक्तींविरुद्ध माझा किंवा आमचा बचाव करा यासाठी प्रार्थना केली जाते. बजरंग बाणचा पाठ मनोकामना पूर्ण करण्यासाठी केला जातो आणि त्याच्या प्रभावामुळे इच्छा पूर्ण होतात असे मानले जाते. 'बजरंग बाण' या शब्दाचा अर्थ 'वज्रासारखा बाण' किंवा 'अत्यंत शक्तिशाली अस्त्र' असा आहे. दरम्यान बजरंगबाणचे पठण करताना काही नियम आणि सावधगिरीने वागणे आवश्यक आहे. याचा उद्देश भक्तांना संरक्षण, शक्ती आणि आत्मरक्षण प्रदान करणे हा आहे. त्याच्या प्रबळ ऊर्जेमुळे, बजरंग बाणचा पाठ अत्यंत नम्रता आणि काळजीपूर्वक करण्याचा सल्ला दिला जातो. असेही सांगतात की, जर मन शुद्ध नसेल तर बजरंगबाणाचा पाठ केल्यानंतर राग वाढू शकतो. त्यामुळे जेव्हा जेव्हा बजरंगबाणाचा पठण करतात, मध्ये-मध्ये श्रीरामाचा जप करण्यास आवर्जून सांगितले जाते. बजरंग बाणमध्ये प्रभू श्रीराम यांच्या शपथेचा उल्लेख काही ओळींमध्ये येतो, त्यामुळे जर हा पाठ पूर्ण श्रद्धा आणि भावनेने केला नाही, तर हनुमानजी नाराज होण्याची शक्यता वाढते असे मानले जाते. म्हणून तुम्ह जेव्हा किंवा जितके दिवस बजरंग बाणचा पाठ करणार आहात तेव्हा त्या कालावधीत ब्रह्मचर्याचे पूर्ण पालन करणे आवश्यक आहे.



# नित्य नवा दिवस!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

प्रत्येक दिवशी मानवी जीवनात ज्याला अधिक मोल आहे किंवा अधिक मोल द्यायला हवे ते म्हणजे उत्तम सुसंस्कारीत विचारांना. त्यानुसार कृती करण्याचाच आपण संकल्प करायला हवा. कारण आपल्या तना बरोबरच जे आपल्या मनाचे स्वास्थ्य ही नीट राखतील, अशा विचारांची साठवण ही अधिक मोलाची असते. ती करण्याचा शुभारंभ हा श्रीगणेशांच्या साक्षीनेच करायला हवा. कारण गणेश ही सद्विचाराची ठेव देणारी, आपले कार्य निर्विघ्न पूर्ण करणारी देवता आहे. आपल्या मानवी प्रयत्नांना त्या ईश्वरी कृपेची जोड मिळाली तर कार्य हे नक्कीच यशस्वी होते.

'वेल बिगनिंग इज हाफ डन' असे जे म्हटले जाते ते काही उगाच नाही. कारण कोणत्याची कार्याची, संकल्पाची, आचार, विचार आणि कृतीची सुरूवात ही जर चांगल्या मुहूर्तावर झाली तर त्यात यश हे नक्कीच मिळते.

**वाचावे धार्मिक । करावा विचार । नित्य नवा दिवस। जागृतीचा।।**

या जीवन संदेशातील नित्य नवा दिवस हा विचार घेऊनच आपण आपले जीवन जगण्यातच खरे मर्म आहे. तीच खरी वैचारिक जागृती आहे. जीवनात उगवलेला नवा दिवस हा आनंदाने, सुखाने, समाधानाने, प्रेमाने घालवायचा हीच खरी सुखी जीवनाची गुरुकिल्ली आहे. कारण आपल्या दैनंदिन जीवनात आपण अनेक लोकांच्या संपर्कात येत असतो. तेव्हा त्यातील सगळ्यांशीच आपले सूत जमेल, मते जुळतील, स्वभाव जुळतील अशी अपेक्षा करणेही चुकीचे असते. अशा वेळी अनेकदा आपल्याला त्यांच्याशी जुळवून घ्यावे लागते. तेथे आग्रही, माझे तेच खरे आणि तसेच व्हायला हवे, असा आग्रह धरून चालत नाही. तेव्हा जुळवून घेण्याची, झाले गेले त्याच क्षणी विसरून जाण्याची सवयही स्वतःला लावून घ्यावी लागते. नको त्या गोष्टी उगाच मनात साठवून ठेवून त्याने व्यथित होण्यापेक्षा तिथले तिथेच सोडायचे आणि जीवनातील प्रत्येक नवा दिवस हा वैचारिक जागृतीने कसा जगायचा हे आपले आपणच ठरवायला लागते.

# बजरंगबलींचे अद्‌भुत गुण, प्रत्येक भक्तात असायलाच हवे!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हनुमानजींचा जन्मोत्सव साजरा करताना त्यांच्या गुणांचाही उत्सव साजरा करायला हवा म्हणजे बजरंगबली हनुमानजी यांच्याकडे असणारे गुण आपल्या जीवनात आत्मसात करायला हवेत. बजरंगबली चिरंजीवी असून महादेवांचा अकरावा रुद्र अवतार म्हणून ओळखले जातात. प्रभू श्रीराम यांच्याप्रती त्यांची भक्ती आणि कार्य अगाध आहे. हनुमानजींचे जीवनकार्य पाहिले तर काही प्रमुख गुण शिकण्यासारखे आहेत. त्यांचे जीवन आजच्या काळातही तितकेच प्रेरणादायी आणि मार्गदर्शक आहे, म्हणूनच अनेक जण त्यांच्यासारखे बनण्याचा किंवा त्यांचा आशीर्वाद मिळवण्याचा प्रयत्न करतात. भक्तांसाठी हनुमानजींचा जन्मोत्सव फक्त सण नाही तर भक्ती, शक्ती आणि सेवेचा उत्सव आहे.

हनुमानजींचे हे गुण त्यांच्या प्रत्येक भक्तात असायला हवेत. ते गुण पुढीलप्रमाणे आहेत.

### १) अपार भक्ती

हनुमानजींची सर्वांत मोठी ताकद म्हणजे त्यांचे युद्धकौशल्य किंवा त्यांचे बलवान आणि विशाल शरीर नव्हते, तर प्रभू श्रीरामांप्रती असलेली त्यांची अखंड भक्ती हीच खरी त्यांची शक्ती होती. त्यांनी श्रीरामांना केवळ देव म्हणून नाही तर प्रेमाचे प्रतीक मानून त्यांची पूजा केली. रामचरितमानसमधील एक प्रसिद्ध चौपाई आहे त्यात म्हटले आहे, 'राम काज कीन्हें बिनु मोहि कहां विश्राम.' हनुमानजी अखंडपणे प्रभू रामांसाठी कार्य करत, श्रीरामांचे काम करत असताना त्यांना कोणत्याही गोष्टींची आठवण येत नसे. एका भक्तासाठी ही मोठी शिकवण आहे की, जेव्हा भक्तीत पूर्ण समर्पण असतं, तेव्हा मार्ग आपोआप खुले होत जातात.

### २) निर्भयता

बजरंबली हनुमान यांना कधीही कोणत्याही गोष्टीची भीती वाटली नाही. त्यांनी अनेक वेळा संकटांचा एकट्याने सामना केला. जिथे कुठे संकट असेल तिथे प्रभू श्रीराम मला समस्येतून बाहेर काढतील ही अपार श्रद्धा त्यांच्या मनात होती. श्रीरामांवरील अढळ श्रद्धेच्या बळावरच प्रत्येक अडचणीवर बजरंगबली यांनी मात केली.

### ३) विनम्रता

हनुमानजी यांना संकटमोचक म्हटले जाते. त्यांचे नामस्मरण करता नकारात्मक शक्ती दूर होतात. हिंदू धर्मातील पौराणिक कथांमध्ये एक बलशाली योद्धा म्हणून ते प्रसिद्ध आहेत. मारुतीरायांकडे अफाट शक्ती होती पण त्यांनी कधीही अहंकार केला नाही. त्यांनी स्वतःला नेहमीच श्रीरामांचा सेवक म्हणून मानले. सदैव ते रामनामाचा जप करत. खऱ्या भक्ताची ओळख त्याच्या विनम्रतेतूनच होते. म्हणून हनुमानजींच्या भक्तानेही सदैव विनम्र राहायला हवे.

### ४) सेवाभाव

हनुमानजींचे संपूर्ण जीवन म्हणजे निःस्वार्थ सेवेचे उत्तम उदाहरण आहे. त्यांनी प्रत्येक कार्य म्हणजे माझ्या प्रभू श्रीरामांचे कार्य आहे असे समजून केले. स्वतःसाठी काहीही न करता, त्यांनी नेहमीच प्रभू श्रीरामांची सेवा हाच त्यांच्या जीवनाचा उद्देश मानला.

### ५) मनाची एकाग्रता आणि संयम

हनुमानजींनी तप, ध्यान आणि साधनेच्या माध्यमातून आपल्या मनावर पूर्ण नियंत्रण मिळवले होते. मन, वचन आणि कर्म यामध्ये समतोल ठेवता आला तर भक्ताला प्रभूच्या अधिक जवळ जाता येते. हनुमानजींचे हे पाच गुण कोणत्याही भक्ताला आधुनिक जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्याची शक्ती देतात. तेव्हा तुम्ही जर स्वतःला बजरंगबली हनुमान यांचे परमभक्त मानत असाल तर त्यांचे हे गुण जीवनात नक्की आत्मसाद करा. बजरंबली हनुमानजी यांची पूजा करताना हे गुण तुमच्या जीवनात उतरविण्याचा संकल्प करा.



# भगवान विष्णू के रूप को समर्पित ओडिशा का श्री जगन्नाथ मंदिर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ओडिशा के पुरी में हर साल निकलने वाली रथयात्रा जितनी प्रसिद्ध है, उससे भी कहीं अधिक रोचक है यहां श्री मंदिर का इतिहास और उसमें भगवान जगन्नाथ के विराजने की कथा। पुरी का यह क्षेत्र पुराणों में सप्त पुरियों में से एक है, जिसे स्कंद पुराण में पुरुषोत्तम क्षेत्र, धरती का वैकुंठ तीर्थ और श्रीकृष्ण के शरीर के नील मेघ श्याम रंग के कारण नीलांचल कहा जाता है। माना जाता है कि जगन्नाथ भगवान स्वयं ही श्रीकृष्ण हैं। पुरी के जगन्नाथ धाम में श्रीकृष्ण भगवान नीलमाधव के नाम से विराजमान हैं। जगन्नाथ पुरी की ऐतिहासिक कथाओं और किंवदंतियों की मानें तो पहले भगवान नीलमाधव का विग्रह पुरी से मीलों दूर किसी जंगल में भील कबीले के पास था। जिसका मुखिया विश्ववसु था।

यह कबीला कई पीढ़ियों से नीलमाधव विग्रह की पूजा करता आ रहा था। कहते हैं कि यह भील कबीला उसी जरा नाम के बहेलिये का वंशज था, जिसने श्रीकृष्ण के पैर में तीर मारा था और इसके बाद श्रीकृष्ण गोलोक धाम को चले गए थे। धरती पर मौजूद उनके पार्थिव शरीर का अंतिम संस्कार अर्जुन ने श्रीकृष्ण के एकमात्र जीवित बचे पोते वज्रनाभ से कराया और फिर द्वारिका की सभी स्त्रियों को लेकर हस्तिनापुर लौट आए। उधर, श्रीकृष्ण का सारा शरीर तो जल गया, लेकिन हृदय बचा रह गया। जरा बहेलिया उसी हृदय को ले आया और कृष्ण मानकर उसे विग्रह स्वरूप में स्थापित कर उसकी पूजा करने लगा। इस पूजा को वह अपने पाप का प्रायश्चित समझता था, जो उससे अनजाने में हुआ था। जरा के वंशज इसी विग्रह की पूजा करते आ रहे थे, जिसे विद्यापति विश्ववसु से चुराकर ले आया था।

पुरी के श्रीमंदिर में विग्रह की स्थापना की तैयारियां हो रही थीं। राजा ने सोचा कि सभी लोगों को नीलमाधव के दर्शन होने चाहिए, इसलिए उसने स्थापना से पहले लोगों में मुनादी करवा दी कि वह भगवान नीलमाधव के दर्शन कर लें। सारा नगर उमड़ आया, लेकिन नीलमाधव का नीला प्रकाश इतना तेज था कि कोई उसे थोड़ा सा भी देख न सका। राजा बहुत दुखी हुआ कि अगर मंदिर में विग्रह की स्थापना कर भी दी, तब भी कोई इसके दर्शन नहीं कर पाएगा। अब वह एक बार फिर भगवान की शरण में था कि वह उसे कोई मार्ग दिखाएं। तब इस बार भगवान नीलमाधव ने उन्हें खुद स्वप्न में दर्शन दिए और कहा, इस मंदिर में मेरी अलौकिक प्रतिमा की स्थापना करो, कल सागर तट पर तुम्हें एक लकड़ी का कुंदा बहता मिलेगा। उसे ले आना. इसीसे मेरा मंदिर विग्रह बनेगा।

राजा अपने परिवार के साथ समुद्र तट पर पहुंचा तो उसे वहां एक लकड़ी का बड़ा कुंद तट पर तैरता मिला। राजा ने सैनिकों को उसे खींच लाने का आदेश दिया, लेकिन कुंदा अपनी जगह से हिला भी नहीं। राजपरिवार ने भी प्रयास किया, लेकिन सब असफल। तब राजा ने हनुमान जी को याद किया और उनसे कुंदा ले चलने की प्रार्थना की। हनुमान जी ने कहा, यह कुंदा राजपरिवार के पाप के बोझ तले दबा है, ऐसे नहीं हिलेगा। पहले अपने पाप का प्रायश्चित करो। राजा बहुत सोचने-विचारने लगा कि आखिर ऐसा क्या पाप हो गया जो कि मंदिर निर्माण में बाधा बन रहा है, लेकिन हनुमान जी की बात छोटे भाई विद्यापति की समझ में आ गई. वह इस विग्रह को चोरी से लाया था, उससे भी बड़ा विश्वास घात उसने पत्नी से किया था. उसने राजा से सारा सच बताया।



राजा ने उससे कहा कि यह तो वाकई पाप है। अगर इस तरह श्रीमंदिर बन भी जाता तब हम इसके पुण्य के भागी नहीं थे। उन्होंने विद्यापति से जल्दी ही भील कबीले की ओर ले चलने के लिए कहा और कहा कि विश्ववसु से मैं खुद क्षमा याचना करूंगा और तुम्हारी पत्नी को राजपरिवार की बहू के रूप में स्वीकार कर सम्मान के साथ लेकर आऊंगा। यह सुनकर विद्यापति के हृदय का भार हल्का हुआ और वह सभी उसी भील कबीले में पहुंचा। राजा ने विश्ववसु को समझाया और पुरी के मंदिर के रूप में अपने सपने की सारी कथा सुनाई। तब विश्ववसु ने कहा कि, हमने अपने पूर्वजों से हमेशा ही सुना है कि यह विग्रह धरोहर के रूप में ही हमारे पास है, सही समय पर यह विश्व के सामने प्रकट हो जाएगा। इसलिए ही हम इसे आजतक छिपाकर रखते आए थे, लेकिन नीलमाधव की इच्छा के विरुद्ध कोई नहीं जा सकता है। इस तरह विश्ववसु ने विद्यापति को क्षमा कर दिया और उनके साथ पुरी आ गया। ललिता भी राजपरिवार की बहू बनी और समय के साथ उसने एक पुत्र को जन्म दिया।

अब राजा इंद्रद्युम्न, विद्यापति और विश्ववसु समुद्रतट पर पहुंचे। इस बार इन तीनों ने मिलकर जय हनुमान कहते हुए जैसे ही लकड़ी का कुंदा उठाया तो वह भारहीन होकर उठ आया। इसी लकड़ी के कुंदे से भगवान जगन्नाथजी यानी श्रीकृष्ण, उनके भाई बलराम और बहन सुभद्रा के साथ ही सुदर्शन चक्र की मूर्ति बनीं। प्रतिमाओं का बनना भी कोई आसान नहीं था, इनके निर्माण की कथा तो और भी दिव्य है।



जब राजा लकड़ी के कुंदे को उठवाकर महल ले आया तो इसके बाद प्रतिमा निर्माण के लिए देशभर से कुशल कारीगर बुलाए गए, लेकिन कोई भी प्रतिमा निर्माण की प्रतिभा नहीं दिखा सका। कुछ ने कहा कि यह कुंदा बहुत मोटा है, इससे आकार में उभार नहीं आएगा, कुछ ने कहा कि वह सिर्फ पत्थर की कलाकारी जानते हैं, काष्ठ की बारीकियां नहीं। कुछ ने कोशिश भी की, लेकिन उनकी हथौड़ियां इस कुंदे पर जरा भी नहीं चल पाईं। राज परिवार में एक बार फिर सन्नाटा छा गया। प्रतिमाएं कैसे बनें, ये बड़ा सवाल था।

इसी सोच-विचार और परीक्षण में कुछ दिन बीत गए। एक दिन सूर्यास्त से ठीक पहले एक वृद्ध राजदरबार में पहुंचा। झुकी कमर, हाथ में लाठी, चेहरे पर झुर्रियां, सफेद दाढ़ी और कंधे पर एक झोला-गठरी, जिसमें से आरी बाहर झांक रही थी। इससे ये तो साफ पता चल रहा था कि यह बूढ़ा कोई काष्ठ का शिल्पकार है। पूछने पर उसने राजा को अपना परिचय दिया शिल्पकार के रूप में दिया और कहा कि मैंने बहुत सी काठ की आकृतियां बनाई हैं, लेकिन अब बस आखिरी बार भगवान की भी मूर्ति बना लूं तो मुझे मोक्ष मिल जाए। उसने राजा से जगन्नाथजी की प्रतिमाएं बनाने की इच्छा जाहिर की।

राजा ने सोचा कि यह खुद इतने वृद्ध और जर्जर हो चुके हैं, पता नहीं निर्माण कर भी पाएंगे कि नहीं, इसलिए राजा ने टालने की गरज से कह दिया कि ठीक है, आप प्रतिमा बनाना चाहते हैं तो पहले आपको परीक्षा देनी होगी। आंख पर पट्टी बांध लीजिए और खुद वहां चलकर जाइए, जहां प्रतिमा निर्माण के लिए काठ रखे हैं। बूढ़े शिल्पी ने बात मान ली और पट्टी बांधकर उसी कमरे की ओर चला जहां लकड़ी का वह कुंदा रखा हुआ था। चौखट पर रुककर बूढ़े शिल्पी ने कहा कि, यह वह कक्ष है न, इसमें ही तो रखा है लकड़ी का कुंदा। राजा और विद्यापति सोच में पड़ गए. विद्यापति ने पूछा कि आप सही जगह पहुंचे हैं, लेकिन आपने कैसे जाना। तब शिल्पी ने कहा कि, समुद्र में भीगी हुई लकड़ी की अलग ही महक होती है, जो आपके लकड़ी के दरवाजों-खिड़कियों किसी में से नहीं आ रही है। राजा उसकी इस बौद्धिक क्षमता का कायल हो गया, लेकिन अबकी बार विश्ववसु ने पूछा कि कुंदे से कितनी प्रतिमाएं बनेंगी। तब शिल्पी ने कहा कि इस कुंदे से चार प्रतिमाएं बनेंगी, एक तो जगन्नाथ जी, नाम के अनुसार ही नीले-काले बादलों के रंग के। दूसरी सुभद्रा, जो कि हल्दी-चंदन की तरह पीले रंग की होगी और तीसरी प्रतिमा बलभद्र की, जो न्याय की तरह शुद्ध सफेद होंगे। इसके अलावा चौथा सुदर्शन चक्र जो कि प्रभु का अस्त्र, उनकी शोभा और कालचक्र का प्रतीक भी बनेगा।

यह सुनकर राजा बहुत खुश हुआ और उसने उस शिल्पी को प्रतिमा बनाने की आज्ञा दे दी। प्रतिमा बनाने की आज्ञा मिलते ही अब उस शिल्पी ने अपनी भी शर्तें बताईं। उसने कहा कि मैं आज बल्कि अभी से प्रतिमा निर्माण शुरू करूंगा और ये प्रतिमाएं मैं २१ दिन में बना दूंगा। मेरी शर्त ये है कि इस २१ दिन की अवधि के दौरान ये निर्माण कक्ष पूरी तरह बंद रहेगा। कोई भी जरा भी विघ्न नहीं डालेगा। अगर किसी ने निर्माण के बीच में इस कक्ष को खोल दिया, तो मैं यहां से चला जाऊंगा, फिर ये प्रतिमाएं अधूरी रह जाएंगी और इन्हें अधूरी ही स्थापित करनी होगी।

राजा पहले ही शिल्पी की दिव्यता से प्रभावित था, इसलिए उसने ये सारी शर्तंए मान लीं। प्रतिमा का निर्माण कार्य शुरू हो गया। कक्ष बंद था, लेकिन उसमें से दिनरात छेनी चलने, हथौड़े पीटने की आवाज आती थी। वृद्ध शिल्पी बिना कुछ खाए-पिए लगातार काम कर रहा था। इधर, रानी गुंडिचा उस वृद्ध के लिए सोच-सोचकर परेशान होती थीं कि यह इतने बुजुर्ग हैं। १० दिन से कुछ नहीं खाया, कहीं उन्हें कुछ हो न जाए, उनका मन शंकाओं से घिर जाता था, लेकिन फिर वह खुद को किसी तरह रोक लेती थीं।

इस तरह १५ दिन बीत गए. एक रात अचानक आवाज आनी बंद हो गईं। रानी चिंतित हुईं, उन्होंने अगले दिन इंतजार किया. राजा से भी चिंता जताई तो राजा ने कहा कि अभी १६ वां दिन ही बीता है, मैं शिल्पी को २१ दिन का वचन दे चुका हूं, इसलिए तब तक इंतजार करते हैं। रानी उस समय तो मान गईं, लेकिन जब अगले दिन भी कक्ष से कोई आवाज नहीं आई तो उनसे रहा नहीं गया और रानी ने किवाड़ खोल दिए। अब जब उन्होंने अंदर देखा तो वहां कोई नहीं था. थीं तो सिर्फ जगन्नाथ, सुभद्रा और बलभद्र की अधूरी बनीं मूर्तियां। इस अधूरेपन की जो दिव्यता थी रानी उसे देखकर चकित हो गईं। राजा ने भी उन्हें देखा तो वह सम्मोहित हो उठा। फिर उसे शिल्पकार की शर्त याद आई कि अगर २१ दिन के पहले द्वार खुला तो इन्हीं अधूरी मूर्तियों को स्थापित करना होगा। राजा ने इसे प्रभु की इच्छा मानकर उन्हें श्रीमंदिर में स्थापित कर दिया।

कहते हैं कि मूर्तियों का निर्माण करने वाले वृद्ध शिल्पकार कोई और नहीं देवशिल्पी विश्वकर्मा थे। उन्होंने ही भगवान की आज्ञा पर इन प्रतिमाओं का निर्माण किया था और उनकी इच्छा के अनुसार ही उन अधूरी मूर्तियों को बनाया था। ये बिल्कुल वैसा ही स्वरूप था, जैसा कि द्वापर में नारद मुनि ने देखा था। जब रोहिणी मां से राधा और रासलीला की कथा सुनते हुए श्रीकृष्ण, बलभद्र और सुभद्रा के शरीर द्रव में बदल गए थे। जगन्नाथ पुरी के श्रीमंदिर में जगन्नाथ जी का यही स्वरूप विराजमान है।

**(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)**